
# संस्कारशील श्याम



डॉ. पवन मांडवकर

पैसे जमविले. त्यातूनच हा कोट शिवला. आई, मागच्या दिवाळीत पुरुषोत्तमने नव्या सदऱ्यासाठी हट्ट धरला होता ना? तेव्हाच मी ठरवले होते की, सदरा किंवा कोट त्याच्यासाठी आणायचा. अण्णा, दादा मोठे झाल्यावर आणतील, असे तूच म्हणाली होतीस ना?”

श्यामचे बोलणे ऐकून आईवडिलांना गहिवरून आलं. आई म्हणाली, “श्याम, तू पैशाने मोठा नाहीस, वयाने मोठा नाहीस, शिक्षणानेही मोठा नाहीस; पण बाळ, आज तू मनाने खूप खूप मोठा झालास.”

वडिलांनी अभिमानाने श्यामच्या पाठीवरून हात फिरवला, शाबासकी दिली.

मित्रांनो, असा होता आपला श्याम. भावनाशील, परोपकारी, सद्गुणी, कष्टाळू, मातृभक्त, प्रेमाचा भुकेला, मानवतावादी अशी किती किती विशेषणे सांगावी? सद्गुणांनी परिपूर्ण असलेला हा श्याम म्हणजेच आपले साने गुरुजी. भारताच्या या महान सुपुत्राचे ११ जून, १९५० ला देहावसान झाले.



महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड समितीने
शासनमान्य यादीकरिता निवडलेले पुस्तक

# संस्कारशील श्याम

ISBN 978-81-925945-2-8

डॉ. पवन मांडवकर

***महाकवी एंटरप्रायजेस***
प्लॉट नं. ४२, ए वॉर्ड, दुसरा बसस्टॉप,
फुलेवाडी, कोल्हापूर ४१६ ०१०

संस्कारशील श्याम
[Sanskarsheel Shyam] (Marathi)
© डॉ. पवन मांडवकर
(Dr. Pavan Mandavkar)
लेखक - संपर्क - भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८
१. एस-१, स्वामिनी अपार्टमेंट, टिळकवाडी, यवतमाळ ४४५ ००१
; (०७२३२) २५२९७५
२. इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५ ४०१
; (०७२०१) २२६१२९ / २२६१४७
३. विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६
; (०७२१) २६७३३८६ / २६७७८५३
४. ए-१३ षिंदे नगर, बावधन, पुणे ४११ ०२१
; (०२०) २२९५१५०१
५. ए-४/७, कासलीवाल क्लासिक, तापडिया नगर, औरंगाबाद
; (०२४०) २३५२३००
६. द्वारा डहाळकर, ९/१, ८२ एच.आय.जी., त्रिमूर्ती नगर, नागपूर
; (०७१२) २२३४०३२
मुखपृष्ठ कु. चैताली जगताप, यवतमाळ
प्रकाशन नोव्हेंबर २०२२
प्रती १०००
प्रकाशक महाकवी एंटरप्रायजेस
गौरव महादेव शिपुगडे
प्लॉट नं. ४२, ए वॉर्ड, दुसरा बसस्टॉप,
फुलेवाडी, कोल्हापूर ४१६ ०१०

मूल्य ९५ रुपये

"अण्णा, हा लहानसा कोट कोणाचा? आई हा बघ कोट. हा काही अण्णाच्या मापाचा नाही. माझ्यासाठी आणलास, होय ना रे अण्णा?"

आईने श्यामला विचारले, "श्याम, कुणाचा रे तो कोट?"

"अग आई, मीच हा दापोलीहून पुरुषोत्तमसाठी शिवून आणला." श्याम बोलला.

"पैसे रे कोठले तुझ्याजवळ? कुठून कर्ज काढलेस की फीचे दवडलेस?" वडिलांनी थोडे काळजीपूर्वक विचारले.

"कोणाच्या पैशांना हातबीत तर नाही ना लावलास, श्याम?" आईच्या आवाजात कातरता होती.

"नाही आई, भाऊ, मी कर्जही काढले नाही, चोरीही केली नाही किंवा फीचेही पैसे दवडले नाहीत." श्यामच्या उच्चारात अभिमान डोकावत होता.

"मग उधार का शिवून आणलास?" वडिलांनी पुन्हा विचारले.

"भाऊ, तुम्ही दरवेळी मला खाऊला आणा-दोन आणे देत होतात ना? मी गेले वर्षभर ते

कोट सुरक्षितपणे जपून तो रस्ता आक्रमीत होता.

ओलाचिंब झालेला श्याम घरी पोचला. त्याला पाहताच सारे आनंदले.

"एवढ्या मुसळधार पावसातून कशाला आलास, श्याम? सगळा भिजलास ना? थोडा पाऊस थांबल्यावर निघायचे होतेस." त्याचे डोके आपल्या पदराने पुसत काळजीच्या सुरात आई म्हणाली.

"नाल्याला पाणी नव्हते का रे? त्यातून कसा आलास?" वडिलांनी विचारले.

"हो, खूप पूर होता; पण मी आलो कसातरी." श्याम म्हणाला.

"त्या दिवशी नाल्यातून एक बाई वाहून गेली हो." वडिलांचा काळजीचा स्वर उमटला.

"गणपतीची कृपा, तू सुखरूप आलास बाळ. चल आता कपडे काढ. मी गरम गरम पाण्याने तुला अंघोळ घालते." आई पाणी तापवायला गेली.

श्यामने अंघोळ केली. तोवर त्याच्या धाकट्या भावाने त्याचे गाठोडे उकलून पाहिले. त्यात एक लहानसा सुंदर कोट त्याला दिसला.



# साने गुरुजी

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात पालगड नावाचे निसर्गसौंदर्याने नटलेले एक गाव आहे. तिथे श्री. सदाशिवराव उर्फ भाऊराव साने आणि सौ. यशोदाबाई उर्फ बयो हे दाम्पत्य राहत होते. २४ डिसेंबर, १८९९ रोजी या दाम्पत्याच्या पोटी सानेगुरुजींचा जन्म झाला. त्यांचे जन्मनाव 'पंढरीनाथ' असले तरी शाळेत मात्र 'पांडुरंग सदाशिव साने' असे नोंदवले होते. पुढे मात्र ते 'साने गुरुजी' म्हणून प्रसिद्ध झाले. वाङ्मयसृष्टीत मात्र त्यांनी स्वतःला



‘श्याम’ या नावाने संबोधले.

सानेगुरुजींचे वडील पालगडचे खोत होते. पूर्वी वैभवसंपन्न असलेले हे घराणे अतिशय चांगुलपणामुळे कालांतराने दरिद्री झाले. कठीण आर्थिक परिस्थितीत जगत असतानाही मुलांवर उत्तम संस्कार करण्यात ते उभयता यशस्वी ठरले.

गुरुजींचे प्राथमिक शिक्षण पालगडला झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना पुण्याला मामाकडे पाठविण्यात आले. पण पुण्यात त्यांचे मन रमले नाही. पुढे ते दापोलीच्या मिशन शाळेत शिकू लागले. तिथे ते हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात. बालपणापासूनच त्यांचे भरपूर पाठांतर होते. पोथ्या, पुराणे, रामायण, महाभारत यांचे मनःपूर्वक वाचन त्यांनी केले होते. मिशन शाळेत शिकत असताना त्यांना कविता करण्याचा नाद लागला. आपल्या शिक्षणाच्या खर्चाचा बोजा आपल्या वडिलांवर पडू नये म्हणून पुढच्या शिक्षणासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मोफत अन्न देणाऱ्या औंध संस्थानात प्रवेश केला.



सुंदर कोट शिवून देण्याची विनंती केली.

कोट तयार झाला. शिंप्याचे शिलाईचे पैसे देऊन श्यामने तो हाती घेतला. कोट पाहून लहान भावास किती आनंद होईल, या कल्पनेनेच त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू पाझरले.

श्याम घरी जाण्यास निघाला. गाडीभाड्यासाठी त्याच्याजवळ पैसे उरलेच नव्हते. तो पायीच निघाला. त्यावेळी मुसळधार पाऊस सुरू होता. वसतिगृहातील सगळ्यांनी त्याला पावसापाण्याचा जाऊ नकोस, असे आग्रहाने सांगितले. नदी-नाल्यांना पूर आले होते. श्यामच्या हृदयातही दुथडी भरून प्रेमपूर आला होता. कसलीही पर्वा न करता, श्यामने गावचा रस्ता धरला. रस्त्यावरून बरेच सरपटणारे प्राणी होते. नाल्यालाही पूर होता. त्यातून न घाबरता श्याम घरी जायला निघाला होता. दगडागोट्यांच्या रस्त्यात पायाला दगड टोचले. विजांचा चमचमाट आणि कडकडाट त्याला भय दाखवीत होता. पण लहान भावाचा

करतील, तेव्हा शिवतील हो तुला नवा सदरा."

धाकट्या भावाचा सदरा खरोखरीच फाटला होता. आई घरीच तो शिवून घालायला देई. आपल्या भावाला आपण एक सदरा शिवून द्यायचाच, असे श्यामने मनाशी ठरवले. पण त्यासाठी पैसे लागतील, ते कुठून आणणार?

श्यामचे वडील महिन्या दोन महिन्यांतून श्यामला भेटण्यास व त्याची फी वगैरे भरण्यास दापोलीला जात. त्यावेळी खाऊसाठी श्यामला आणा, दोन आणे देऊन ठेवीत. खाऊचे पैसे मुळीच खर्च न करता ते जमविण्याचे श्यामने ठरविले. गणेश चतुर्थीला श्यामला गावी जाण्यासाठी सुटी मिळे. तोपर्यंत श्याम आपल्याजवळ जमलेले पैसे रोज मोजत असे. गणेश चतुर्थी जवळ आली. जमविलेले पैसे आणि धाकट्या भावाच्या वयाच्या एका विद्यार्थ्याला घेऊन श्याम एका शिंप्याकडे गेला. त्याच्या सांगण्याप्रमाणे दोन वार कोटाचे कापड व एक वार अस्तरचे कापड त्याने शिंप्यास दिले व



शिक्षणासाठी त्यांनी खूप कष्ट उपसले. प्रसंगी पोट भरण्यासाठी माधुकरी मागितली. दुर्दैवाने औंधला प्लेग सुरू झाल्यामुळे गुरुजींना शाळा सोडून घरी परतावे लागले. वडिलांना मात्र ते शाळा सोडून पळून आल्याचा संशय आला. ते रागावले म्हणून साने गुरुजी तडक पुण्याला शिक्षणासाठी येऊन पोचले.

पुण्यातही त्यांचे खूप हाल झाले. शिकत असताना कित्येकदा डाळ्याचुरमुरे खाऊन पाण्याने पोट भरावे लागले. कितीही त्रास झाला तरी शिक्षणाकडे पाठ फिरवायची नाही, या निर्धाराने मॅट्रीक, बी.ए. आणि पुढे एम.ए.ही झाले. अंमळनेरच्या शाळेत शिक्षक म्हणून त्यांना नोकरी मिळाली. काही दिवसांनी ते तेथील वसतिगृहाचे प्रमुख झाले आणि विद्यार्थ्यांमध्ये मिसळून गेले. विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी संपूर्ण आयुष्यभर गुरुजींनी अपरिमित श्रम वेचले.

पुढे साने गुरुजी राजकीय चळवळीत

उतरले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांना तुरुंगातही जावे लागले. सामाजिक चळवळीतही त्यांनी आपले जीवन झोकून दिले होते. पंढरपूरचे मंदिर हरिजनांसाठी मोकळे व्हावे म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर जनजागृतीचे दौरे केले. उपोषण केले. प्रांताप्रांतातील द्वेषभाव नाहीसा करण्यासाठी त्यांनी आंतरभारतीची संकल्पना मांडली. हे त्यांचे कार्य अपुरे असतानाच दुर्दैवाने ११ जून १९५० या दिवशी त्यांचे निधन झाले.

'मेणबत्तीप्रमाणे दुसऱ्याला प्रकाश देत देत स्वतः जळून जावे' हे त्यांच्या जीवनाचे उदात्त ध्येय होते.

'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' असे सांगणारे ते प्रेमधर्माचे यात्रिक होते.

'करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे' असे म्हणून निष्पाप बालकांवर उत्तम संस्कार करणारे, गोड गोष्टी सांगून मुलांमध्ये रमणारे लाडके गुरुजी म्हणून साने गुरुजींची विद्यार्थ्यांना



गेला नाही, एवढेच समाधान तिला वाटले.

"श्याम, पुन्हा नको हो हात लावू दुसऱ्यांच्या वस्तूला. हाच पहिला आणि शेवटचा हात लावलास, असे समजू ना मी? तू कबूल केलेस, हे फार छान झाले. आता रडू नकोस. उगी राहा बाळ."

पाहुण्यांनी श्यामचे कौतुक केले व एक रुपया बक्षीस म्हणून त्याला दिला. श्यामने लगेच तो आईच्या स्वाधीन केला.

# श्यामचे बंधूप्रेम

सुटी संपताच श्याम दापोलीला शाळेसाठी परतला. सुटीत त्याचा लहान भाऊ नवीन सदऱ्याकरिता हट्ट धरून बसला होता. आर्थिक विवंचनेमुळे त्याची समजूत घालताना आई म्हणाली,

"तुझे दादा, अण्णा मोठे होतील, कमाई

विचारल्याबरोबर त्याने कबूल केले होते. श्याम, नाही ना हात लावलास तू?"

केवढा विश्वास होता आईचा आपल्या मुलावर! तिच्या श्रद्धामय शब्दांनी श्यामचा असत्याचा बंगला कोसळला. अगदी जमीनदोस्त झाला. त्याच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहू लागल्या.

"श्याम, रडू नकोस. तू चोरी केली, असे का मी म्हटले? मला खात्री आहे, तू नाही घ्यायचास. उगी हो." आईच्या ह्या प्रेमळ शब्दांनी श्याम खूपच शरमिंदा झाला. केविलवाणे रडत तो म्हणाला, "आई, ह्या तुझ्या श्यामनेच पाहुण्यांची नोट घेतली. ही घे ती नोट. आई, आई, मी फार वाईट आहे ग. मी चोर आहे." त्याच्याने बोलवेना. तो आईच्या पदरात तोंड लपवून हुंदके देऊ लागला. आईला फारच वाईट वाटले. किती विश्वास होता तिचा श्यामवर! किती अभिमान होता तिला त्याचा! पण श्यामने चोरी केली होती. तरीही 'गुन्हा केल्यास तो कबूल करील' ह्या तिच्या विश्वासाला मात्र तडा



ओढ होती. 'आई माझा गुरू, आई कल्पतरू' अशा प्रकारे त्यांना घडविणाऱ्या मातेची महती त्यांनी गायली आहे. आईविषयी कृतज्ञता व्यक्त करणारे अनेक लेख त्यांनी लिहिले. प्रेमळ गुरुजी, थोर मातृभक्त, नम्र समाजसेवक, आदर्श शिक्षक, संस्कारशील लेखक अशी विविध विशेषणे त्यांना यथार्थ शोभतात.

अशा या साने गुरुजींच्या किंवा आपल्या श्यामच्या काही छान छान गोष्टी मित्रांनो, खास तुमच्यासाठी!

# लाज

श्यामची आई सावित्रीचे व्रत करायची. दररोज १०८ प्रदक्षिणा अशा तीन दिवस ती वडाला घालायची. तीन दिवस तिचा निर्जळा उपवासही

असायचा. एकदा अशाच सावित्रीव्रताच्या वेळी श्यामची आई आजारी होती. खूप थकवा आला होता तिला. उपवास आणि हिवताप यामुळे तिला घेरी येत होती. तरीही व्रत पूर्ण करायचे, हा तिचा निर्धार होता. त्यावेळी श्याम आठ-नऊ वर्षांचा होता. आईने श्यामला हाक मारली.

"काय आई, पाय चेपून देऊ का?"

"नको रे, रोज किती चेपशील बाळा? तू सुद्धा कंटाळला असशील. पण दुसरं एक काम सांगू का? करशील तू?" आईने क्षीण आवाजात विचारलं.

"कोणते काम? आई, मी कधीतरी नाही म्हटले आहे का?" श्याम म्हणाला.

"हे बघ श्याम, उद्यापासून वटसावित्रीचे व्रत सुरू होईल. मला भोवळ येते. त्यामुळे वडाला १०८ प्रदक्षिणा मला घालता येणार नाहीत. तीन प्रदक्षिणा मी घालीन. बाकीच्या तू घाल हो बाळ." करुण दृष्टीने श्यामकडे बघत आई हळूहळू बोलली.



शोधाशोध सुरू होती. पाहुण्यांनी विचारले,

"श्याम, तुझा कोणी मित्रवगैरे आला होता का? माझी एक नोट चोरीला गेली म्हणून विचारतो."

"नाही बुवा, मीच आज मित्रांशी खेळायला बाहेर गेलो होतो." श्याम उत्तरला.

"श्याम, तू तर नाही ना घेतलीस? घेतली असशील तर सांगून टाक." श्यामचे वडील बोलले.

"छे हो, तो कशाला घेईल?" पाहुण्यांना श्यामचा विश्वास होता.

"श्याम, अगदी खरेच नाही ना घेतलीस तू? दोन दिवसांमागे कंपासपेटीसाठी पैसे मागत होतास ना?" वडिलांनी पुन्हा म्हटले.

आई लगेच म्हणाली, "माझा श्याम नाही हो घ्यायचा. तो रागावला, रुसला तरी कोणाच्या वस्तूस हात नाही लावायचा; आणि असे काही केले, तर तो लगेच कबूल करतो. मागे एकदा डब्यातली एक वडी त्याने घेतली होती. तेव्हा

इतकासाच भात कसा पुरेल?”

पाहुण्यांची नोट आपल्या घरात हरवली, याचे तिला वाईट वाटले. ती म्हणाली,

“बाळ, इच्छाच नाही बघ. दोन घास बळेच कसेतरी पोटात दवडायचे. कामधंदा झाला पाहिजे नं? उदकपाणी करता आले पाहिजे, म्हणून जेवायचे. तुम्ही मुले कधी एकदा मोठी व्हाल, इकडेच लक्ष लागून राहिले आहे.”

“आई, मी खरंच खूप मोठा होईन. पुष्कळ शिकेन. भरपूर वाचन करीन.”

“शीक हो बाळ, पण चांगला हो. चोरी-चहाडी करू नकोस. शिकलेले लोक बिघडतात असे म्हणतात, म्हणून भीती वाटते. माझी मुले खोट्या प्रतिष्ठेने मोठी नाही झाली तरी चालेल; परंतु ती गुणी असू देत, एवढीच प्रार्थना मी रोज देवाला करते.” आई म्हणाली.

श्यामच्या मनाला टोचणी लागली होती; पण तो गप्प राहिला. इकडे हरवलेल्या नोटेची



“पण माझ्या ग प्रदक्षिणा कशा चालतील देवाला?” श्यामने विचारले.


“चालतील हो बाळ. देवाला डोळे आहेत बरं. मी दुबळी, आजारी आहे, हे देवाला माहीत आहे.” आई समजावणीच्या सुरात म्हणाली.

“पण बायका मला हसतील. शाळेतील मुले चिडवतील. मला लाज वाटते. मी नाही घालणार प्रदक्षिणा.” श्यामने नकार दिला. आई खिन्न झाली.

“श्याम, आईचे काम करावयास कसली रे लाज? हे देवाचे काम आहे. ते करत असताना तुला कोणी हसले तर तेच वेडे ठरतील. देवाचे काम करावयास लाजू नये. पाप करावयास माणसाने लाजावे. तू नसलास जाणार, तर मी जाईन हो. येऊन जाऊन काय होईल? मी भोवळ येऊन पडेन. मरेन तर सुटेन एकदाची. देवाजवळ तरी जाईन.” आईचे हे शब्द श्यामच्या मनात खोलवर गेले. त्याचे हृदय विरघळले. तो लगेच आईच्या पाया पडला.

“आई, जाईन हो मी. मला कोणी हसो

वा कोणी काही म्हणो, मी जाईन. पुंडलीक आईबाबांची सेवा करून मोठा झाला. देवाला बांधून आणता झाला. तुझे काम करून मला तुझा आणि देवाचा लाडका होऊ दे."



आईने श्यामला जवळ घेतले. 'चांगले काम करताना लाज नको. पाप करताना माणसाने लाजावे.' हे आईचे शब्द पुढील संपूर्ण आयुष्यात श्याम कधीच विसरला नाही.



एकच नोट हवी होती. दुसऱ्याचे पैसे चोरणे हे पाप आहे, ह्याची त्याला जाणीव होती. तरीही धार्मिक पुस्तके वाचण्यासाठी हे पाप झाले तरी चालेल, अशी त्याने आपल्या मनाची समजूत घातली आणि गुपचूप एक नोट पळविली.

संध्याकाळी श्याम आपल्या लहान भावाला 'दे दयानिधे बुद्धी चांगली' हा श्लोक शिकवीत होता. पाहुणे आणि श्यामचे वडील बाजूला गोष्टी करीत होते. पाहुण्यांनी आपल्या खिशातील नोटा मोजल्या आणि ते भाऊरावांना म्हणाले,

"एक नोट कमी भरते आहे."

"नीट मोजल्यात का? सगळ्या खिशांत पाहिल्यात का? कुणाला दिली तर नाही?" वडिलांनी सरळपणे त्यांना विचारले.

हे बोलणे ऐकताच श्यामचे शिकवणे थांबले. तो आत आईकडे गेला. सगळ्यांची जेवणे झाली होती. आईसाठी फारच थोडासा भात उरला होता. ते पाहून श्याम म्हणाला, "आई, तुला

तो कधीच भेदभाव करीत नाही. त्याला सारेच प्रिय असतात. मग देवाला जे आवडते श्याम, तेच आपण केले पाहिजे नं? आपण सगळ्यांवर प्रेम करायला शिकावे."

आईची ही शिकवण श्यामने अंगिकारली.

# मोठा होण्यासाठी चोरी

श्यामला बालपणापासूनच वाचनाचा खूप छंद होता. धार्मिक ग्रंथांच्या वाचनात त्याला अधिक रस होता. रामायण, महाभारत, भागवत त्याने आवडीने वाचले होते. रामतीर्थांचे ग्रंथ त्याला वाचण्यासाठी विकत घ्यायचे होते. पण पैसे नसल्यामुळे तो काहीच करू शकत नव्हता. त्याच सुमारास त्यांच्याकडे एक पाहुणे आले होते. त्यांच्या खिशात बऱ्याच नोटा असल्याचे श्यामने पाहिले होते. त्याला रामतीर्थांचे खंड घेण्यासाठी फक्त




# मुकी फुले

आईच्या पूजेसाठी श्याम रोज फुले तोडून आणायचा. बकुळीच्या फुलांचा सडा पहाटेच पडतो म्हणून तो सकाळी लवकर उठून फुले वेचायचा; तर संध्याकाळी शाळा सुटल्यावर गुलबक्षीची नुकतीच उमललेली रंगीबेरंगी फुले तो तोडून आणायचा. स्वतःच्या घरी बाग नसल्यामुळे फुले आणण्यासाठी त्याला दुसऱ्यांच्या घरी जावे लागे. त्याच्यासोबत त्याचे मित्रही असत. ते त्यांच्या घरच्या देवांसाठी फुले नेत. रविवारी सुटी असल्यामुळे कोण केव्हा फुले आणायला जाईल, याचा नेम नसे.

एका रविवारी श्यामचे मित्र त्याच्या नकळत लवकर गेले आणि त्यांनी सगळी फुले तोडून नेली. श्यामला फुले मिळाली नाहीत. त्याला वाईट वाटले. दुसऱ्या रविवारी दुपारी सगळ्यांच्या आधी जाऊन फुले तोडून आणायचे त्याने ठरविले.

गुलबक्षीची फुले दुपारी चारनंतर फुलू लागतात. संध्याकाळी ती पूर्ण फुलतात. पण श्याम त्या दिवशी तीन वाजताच गेला आणि त्याने भराभर सगळ्या कळ्याच खुडून आणल्या. घरी आल्यावर त्या नीट उमलाव्या म्हणून ताम्हनात पाणी घालून त्यात ठेवल्या. पण मुक्या तोडलेल्या कळ्या उमलणार कशा? त्या नीट फुलल्या नाहीत. श्यामने तशाच परडीत घालून आईला नेऊन दिल्या.

"हे रे काय श्याम, कळ्याच तोडून





आई म्हणाली, "थांब जराशी. सकाळचा भात आहे, तो खाऊन घे."

"देव तुमचं भलं करो मायबाई. गरिबाचा कुनी वाली नाई बगा."

आईने पत्रावळीवर वाढून दिलेला भात म्हातारीने रस्त्याच्या कडेला बसून खाल्ला. श्यामने तिला पाणी वाढले. ते ओंजळीने ती प्यायली. मोळीची किंमतही आईने तिला भरपूर दिली. श्यामला आणि आईला दुवा देत ती हळूहळू घराकडे गेली.

ती गेल्यावर आई श्यामला म्हणाली, "बाळ, देवाच्या दरबारात सगळेच समान असतात. तेथे सारेच पवित्र. तसे नसते, तर विष्णूने माशाचे, कासवाचे, सिंहाचे रूप घेतले असते का? देव गजेंद्रासाठी धावला. घोड्यांना त्याने खरारा केला. गरिबांच्या गाई चारल्या. त्याला भक्तिभावाने नमन करणारे सगळेच आवडतात. त्याला कुब्जाही आवडते, शबरीही आवडते. जटायू हा पक्षीही त्याला प्रिय, तर हनुमान हा वानरप्रमुखतर त्याचा उजवा हात.

"मी घरी जाऊन अंघोळ करणार आहे. ही बिचारी अशक्त, आजारी म्हातारी किती वेळ थांबणार मदत मिळविण्यासाठी? तिला घरी जायला काळोख होईल. नदीतून जायचे आहे तिला." असे उत्तर देऊन श्याम घरी आला.

आई लगेच म्हणाली, "अरे श्याम, त्या बाईला आपल्या घरीच बोलव. आपल्या घरचे सरपणही संपत आले आहे. ती बिचारी आता यापुढे किती लांब बाजारात जाईल? जा, हाक मार तिला आणि आपल्या अंगणात मोळी ठेवायला सांग बरं." श्यामने त्याप्रमाणे केले.

आईने मृदू स्वरात तिला विचारले, "म्हातारे, आजारी आहेस का ग? खूप थकलेली दिसतेस."

"व्हय माय बाई, लई ताप येतो. काय करणार? पोटाला काही हवं ना? सकायधरून पोटात अन्न नाही. ही मोळी विकून तांदूळ घरी नेईन, मग पेज जेवीन."



आणल्यास? अरे झाडावर नीट फुलू द्यायचे होतेस त्यांना." आई म्हणाली.

इतक्यात श्यामची मित्रमंडळी घरात शिरली. श्यामने त्यांच्या नकळत लवकर जाऊन कशी सगळी फुले तोडून आणली आणि त्यांच्यासाठी एकही फूल शिल्लक ठेवले नसल्याचे श्यामच्या आईला त्यांनी सांगितले. आईने शांतपणे सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. मग ती श्यामच्या मित्रांना म्हणाली,

"ही घ्या बाळांनो, तुम्हांला फुले. पुन्हा नाही हो श्याम असे करणार. नाही ना रे श्याम?"

श्यामचा चेहरा गोरामोरा झाला. श्यामने आणलेल्या अर्धवट उमललेल्या फुलांपैकी बरीच फुले आईने मुलांना देऊन टाकली. मुले निघून गेल्यानंतर आई श्यामला म्हणाली,

"श्याम, दुसऱ्यांच्या घरची फुले तोडताना आधी त्यांची परवानगी घ्यावी. आपण आधी गेलो तर त्यांना हाक मारावी. परंतु सर्वात वाईट गोष्ट म्हणजे अशी मुकी फुले झाडावरून तोडणे. फुलांना

आधी झाडावर नीट उमलू द्यावे. बाहेरच्या पाण्यात तू कळ्या कितीही वेळ टाकल्यास तरी त्या झाडावरच्यासारख्या फुलत नाहीत. झाडे म्हणजे फुलांची माता. त्या कळ्यांना जीवनरस पाजत असतात. त्यांना फुलवतात. फुले पूर्ण फुलल्यानंतरच ती देवासाठी तोडावी. आपल्या देवांना दोन फुले कमी मिळाली तरी चालतील. इतरांच्या घरच्या देवांना मिळाली तरी ती शेवटी देवालाच मिळणार ना? देवाला एक फूल मिळाले तरी पुरे होते हो, पण ते पूर्ण फुललेले वाहावे."

श्यामला आईचे म्हणणे मनोमन पटले. अर्धवट केलेली कामेही अशीच नीट फुलत नाहीत, पार पडत नाहीत, हा बोध त्याला झाला.





माझी नको फिकीर तुम्हाला." असे म्हणत श्यामने तिच्या डोक्यावर मोळी उचलून दिली.

इतक्यात आजूबाजूची मंडळी तिथे गोळा झाली व म्हणाली, "अरे श्याम, ती महारीण. तिला शिवलास का? इंग्रजी शिकून साहेब झालास वाटतं. थांब, भाऊरावांनाच सांगावे लागतील तुझे हे थेर." "श्याम, काही लाजलज्जा, भीडभाड? अगदीच चेवलास रे तू. तुला काही ताळतंत्र आहे की नाही?" अशाप्रकारे सगळेच बोलू लागले.

मी घरी जाऊन अंघोळ करणार आहे. ती बिचारी म्हातारी किती वेळपासून कोणी महार डोक्यावर मोळी द्यायला येतो का, म्हणून वाट बघत बसली आहे. ती बाजारात जाईल कधी? तिची मोळी विकेल कधी? परत तिला कितीतरी दूर महारवाड्यात जायचे आहे, असे सगळे सांग आणि तिची मोळी उचलून तिच्या डोक्यावर दे तू."

श्याम निघाला. सहज रस्त्याने जातानाच जणू आपल्याला ती मोळीवाली दिसली, असे त्याने भासवले. जाता जाता म्हातारीकडे पाहून तो म्हणाला,

"आजीबाई, डोक्यावर द्यायला हवी का मोळी? चला मी देतो."

"नको नको दादा, तुमी बामन. कुनी पायलं तर मारतील मला अन् तुमालाबी दोस लागंल. जा बाबा तुमी. कोनी म्हार येईल इकून तिकून, तो चढवील माजी मोळी माज्या डोक्यावर." म्हातारी गयावया करीत श्यामला म्हणाली.

"मी घरी गेल्यावर अंघोळ करून घेईन.



# स्वच्छ मन

श्याम रोज संध्याकाळी खेळायला जात असे. खेळून आल्यावर तो स्वच्छ अंघोळ करीत असे. रात्री निजण्यापूर्वी अंघोळ झाली की शरीर स्वच्छ, निर्मळ आणि हलके वाटते; तसेच निजायच्या आधी देवाची प्रार्थना म्हणून मनाचे स्नान केल्यास शांत झोप येते, याची जाणीव श्यामला आईने करून दिली होती.

एके दिवशी श्याम नेहमीप्रमाणे खेळून आला. अंघोळीस बसला. आईने त्याचे अंग चोळून दिले. मग तो अंगावर पाणी घेऊ लागला. स्नान होताच आईने त्याला हाक मारली.

"आई, अंग पुसून दे माझे. थंडी लागते मला."

आईने आपल्या लुगड्याच्या ओच्याने त्याचे अंग पुसून दिले. मग ती श्यामला म्हणाली,

"कपडे घाल आणि देवासाठी फुले काढ."

"आई माझ्या पायांचे तळवे ओले आहेत. त्यांना माती लागेल. ते पुसून दे." श्याम म्हणाला.

"तळवे ओले राहिले तर काय झाले रे? ते आता कशाने पुसू?" आईने विचारलं.

"तुझा पदर पसर, त्यावर पाय ठेवून मी तळवे टिपून घेईन. मला नाही आवडत पायांना माती लागलेली." श्यामने हट्ट धरला.

आईने आपला पदर जमिनीवर पसरला. त्यावर श्यामने आपले दोन्ही पाय ठेवले. नीट टिपून त्याने टुणकन उडी मारली. आईचा पदर आणि ओचे ओले झाले. मुलाच्या पायाला माती लागू नये, त्याची हौस पुरवावी, म्हणून तिने आपले लुगडे ओले करून घेतले.

श्याम घरात गेला. देवाची फुले काढू लागला. आई निरांजन घेऊन आली आणि म्हणाली,

"श्याम, पायाला माती लागू नये, म्हणून जपतोस, तसाच मनाला घाण लागू नये, म्हणून जप हो. देवाला सांग, शुद्ध बुद्धी दे म्हणून."



# देवाला सारेच प्रिय

"श्याम, तुला एक काम सांगते. ते करतोस बाळा? त्या कोपऱ्यावर एक महारीण बसली आहे. म्हातारी आहे बिचारी! तिच्या डोक्यावरची लाकडाची मोळी खाली पडली आहे. ती अशक्त आणि आजारी दिसते आहे. तिची मोळी उचलून जरा तिच्या डोक्यावर चढवून दे आणि मग घरी ये. मी तुला अंघोळीला पाणी देईन, जा." आईने श्यामला सांगितले.

श्याम घाबरून म्हणाला, "आई, लोकांनी बघितले तर मला काय म्हणतील? मी तिला शिवलो तर मला मारायला येतील ना?"

त्या काळात अस्पृश्यता प्रखरपणे पाळली जायची. ग्रामीण भागात तर त्याची तीव्रता अधिकच होती. स्पर्शच काय, पण सावलीचाही विटाळ मानला जात असे.

"कुणी काही म्हणाले, तर त्यांना सांग,

सुटसुटीत सुंदर व्याख्या केली!

श्यामने केस कापले. त्याची अंघोळ झाली. वडील शेतातील काम आटोपून आले आणि आईला म्हणाले, “हे घे तवसे. (तवसे म्हणजे लांबुळकी काकडी) श्यामला आवडतात ना? मग तवशाची पातोळी कर. मी अंघोळ करून देवळात जातो. श्याम, तू परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण व्हावा म्हणून मी दर पंधरा दिवशी गणपतीला एकादष्णी करीत असतो हो.”

वडिलांचे ते बोलणे ऐकून आणि आपल्याविषयीची काळजी पाहून श्याम वरमला. तो राग विसरला. आपले बरे व्हावे म्हणून वडील देवास आळवतात, आपली आवड लक्षात ठेवून त्यांनी तवसे आणले हे पाहून त्याच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले. पितृहृदयाची महती त्याला कळली. पुन्हा कधीही त्याने गैरसमज करून घेतला नाही.



किती गोड शब्द, किती निर्मळ विचार हे श्यामच्या आईचे! आपल्या मनात कधी दुष्ट, पापी, हीन विचार येऊ नयेत. मन नेहमी स्वच्छ, निर्मळ, पवित्र राहावे, ही सुसंस्काराची शिदोरी श्यामने आयुष्यभर जपली.

# खोटे कधी बोलू नये

पूर्वी जेवणावळी होत. त्यात पंगतीत भोजन सुरू करण्यापूर्वी सुंदर संस्कारशील श्लोक वा कविता म्हटल्या जात. अशाच एका जेवणाचे आमंत्रण आले होते. श्यामचे वडील बाहेरगावी गेले असल्यामुळे श्याम त्या ठिकाणी गेला.

मंडळी जेवायला बसली. श्लोक म्हणण्यास सुरुवात झाली. श्याम काहीसा लाजाळू मुलगा होता. तो मुकाट्याने जेवत होता. पंगतीतील

अनेकांनी त्याला श्लोक म्हणण्यासाठी आग्रह केला; पण श्यामला काही धैर्य झाले नाही. तो श्लोक न म्हणताच जेऊन घरी गेला.

घरी पोचताच आईने विचारले, "श्याम, श्लोक म्हटलास ना?"

श्यामने खोटेच सांगितले, "हो आई, म्हटला ना."

"कोणता म्हटलास? लोकांना आवडला का तो?"

श्यामने पुन्हा खोटेच सांगितले, " 'नेत्री दोन हिरे, प्रकाश पसरे' हा म्हटला. तुला म्हणून दाखवू का?"

इतक्यात जेवायला गेलेली शेजारची मुले तिथे आली आणि त्यांनी श्यामच्या आईला खरे काय ते सांगून टाकले. आईला खूप वाईट वाटले. मुले निघून गेल्यावर ती श्यामला म्हणाली,

"श्याम, तू श्लोक म्हटला नाहीस, ही पहिली चूक केलीस आणि खोटे बोललास ही तर



आई समजूत काढीत म्हणाली, "असे नको हो करू श्याम. अरे, ते जे बोलले, ते त्यांच्या मनात का असते? बाहेर कोणी अपमान केला असेल, त्याचा राग तुझ्यावर निघाला. इतकी वर्षे त्यांनी तुम्हा मुलांसाठी खस्ता खाल्ल्या, तुम्हांला सुखाने वाढविले; तर मग दोन शब्द बोलण्याचाही अधिकार त्यांना नाही का? तुमच्या विद्येसाठी कर्ज काढून ते स्वतः फाटकी धोतरे नेसून पैसे पाठवतात. पण त्यांना बरे वाटावे म्हणून साधी हजामत करून घेण्यासही तू तयार नसावेस का? आईबापांच्या धर्मभावना दुखावू नयेत म्हणून इतकेही तू करू नये?"

"केसात कसला आलाय ग धर्म?" श्यामने विचारले.

"बाळ, धर्म प्रत्येक गोष्टीत आहे. काय खावे, काय प्यावे, काय द्यावे यातही धर्म आहे. केस तरी तू का ठेवतोस? मोह वाटतो म्हणूनच ना? मोह सोडणे म्हणजे धर्म." आईने समजावून सांगितले. पहा आईने धर्माची किती सोपी आणि

येथे तासटून घे. नाहीतर इथे राहू नकोस."

श्याम प्रेमाचा भुकेला होता. वडिलांचे रागाचे बोलणे ऐकून तो रडू लागला. वडील आणखी रागावले.

"काय झाले रे उगाचच रडायला? कोणी का मारले आहे तुला? नसती सोंगे आणता येतात सारी."

आई शांतपणे म्हणाली, "करील हो तो उद्या डोके. तेथे हजामाला पैसे द्यायला लागतात. त्याच्याजवळ नसतील, म्हणून राहिले असेल. श्याम, उगी हो, रडू नकोस."

पहाटे वडील शेतावर गेले. आई ओव्या म्हणत जात्यावर दळण दळीत होती. श्याम तिच्याजवळ जाऊन म्हणाला,

"आई, मी आपला लगेच दापोलीला निघून जातो. माझ्या येण्याने भाऊ किती रागे भरले, पाहिलेस ना?" श्याम वडिलांना भाऊ म्हणायचा.



फार भयंकर चूक. जा, देवाच्या पाया पड आणि म्हण की मी पुन्हा खोटे बोलणार नाही."

श्याम जागचा हलला नाही. तो तिथेच उभा राहिला.

"जा, देवाच्या पाया पड, नाहीतर घरी येऊ देत, त्यांना सांगेन. मग तुला बोलणी खावी लागतील. मारही बसेल बरं!"

तरीही श्याम मुखस्तंभासारखा तिथे उभाच राहिला.

रात्री श्यामचे वडील गावाहून घरी आले. मुले झोपली होती. नित्य नेमाप्रमाणे मुलांना पहाटे उठवून त्यांनी भूपाळ्या म्हणावयास सांगितले. नंतर त्यांनी श्यामला विचारले, "श्याम, काल तू पंगतीत कोणता श्लोक म्हटलास?"

त्यावर आईने काय खरी घटना घडली, ती सांगितली. श्यामने खोटे बोलूनही देवाची क्षमा मागितली नाही, हेही सांगितले. ते ऐकून श्यामचे वडील खूप रागावले. ते म्हणाले,

“होय रे श्याम? चल ऊठ, आधी त्या भिंतीकडे तोंड करून उभा राहा. खरंच तू काल श्लोक म्हटलास?”

वडिलांचा राग पाहून श्याम घाबरला. तो रडू लागला.

“नाही म्हटला.” रडत रडत त्याने कबूल केले.

“मग आईला खोटं का सांगितलंस?” त्यांचा आवाज आणखी चढला.

“आता पुन्हा नाही खोटं बोलणार.” श्याम थरथर कापत बोलला.

“आणि तुझी आई देवाच्या पाया पड म्हणत होती, ते का ऐकले नाहीस?”

श्याम रडत रडत आईजवळ गेला. तिच्या पायांवर त्याने डोके ठेवले.

“आई, चुकलो मी. मला क्षमा कर.”

आई विरघळली. तिने श्यामला पोटाशी धरले आणि सांगितले,



आत्ताच तर आला आहे तो. दमून गेला आहे. गळून गेल्यासारखे वाटते आहे म्हणाला. म्हणून मी थांबवला इथे. जा बाळ श्याम, संध्या करून घे.”

श्याम पाटावर बसला. पळी, पंचपात्री, ताम्हण समोर होते; पण त्याच्या डोळ्यांत पाणी भरले होते. एवढ्यात वडिलांची नजर त्याच्या डोक्यावर वाढलेल्या केसांकडे गेली.

“काय रे हे? डोके केवढे वाढले आहे? हजाम मिळत नाही वाटते दापोलीला. मी तिथे आलो होतो, तेव्हा बजावले होते ना तुला डोके करून घे म्हणून. का केले नाहीस? आता उद्याच



"आई, तुला पहायला आलो ग. तू प्रेमाने माझ्याकडे पाहिलेस, काही उपदेश केलास की मला शक्ती येते." श्यामचे हे बोलणे ऐकून आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

थोड्या वेळाने श्यामचे वडील बाहेरून आले. ते कोठूनतरी त्रस्त होऊन आल्याने कुणाशीच काही बोलले नाही. श्याम घरी आल्याचे त्यांना फारसे आवडले नाही, असे त्यांच्या चर्येवरून वाटत होते. त्यांनी बाहेरून येताच स्वच्छ हातपाय धुतले आणि ते संध्येला बसले.

"का रे, संध्यावगैरे झाली का तुझी?" त्यांनी श्यामला विचारले.

"नाही, आता करतो." थकूनभागून आलेला श्याम हळूच पुटपुटला.

"अरेच्चा, मग तिथे बायकांसारखे चुलीजवळ बसून काय करतो आहेस? चल ऊठ, आधी संध्या कर." ते रागावून बोलले.

आई त्यांना समजावत म्हणाली, "अहो,



"जा, आधी देवाच्या पाया पड आणि पुन्हा खोटे बोलण्याची दुर्बुद्धी मला देऊ नकोस, असे प्रार्थून म्हण."

श्यामने त्याप्रमाणे केले आणि पुन्हा वडिलांच्या आज्ञेप्रमाणे भिंतीजवळ जाऊन उभा राहिला. लवकरच वडिलांचाही राग मावळला. त्यांनी श्यामला आपल्याजवळ बोलावले. प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले, "जा, हवे तर नीज थोडा वेळ. का शेतावर येतोस माझ्याबरोबर? पाने आणूया पत्रावळी लावण्यासाठी."

अशाप्रकारे श्यामच्या वडिलांनी सगळे गंभीर वातावरण बदलून टाकले. रागाचे ढग दूर उडून गेले आणि प्रेमाचा प्रकाश तिथे पसरला. हा प्रेमाचा प्रकाश श्यामच्या जीवनात निरंतर वास करीत होता. 'खोटे कधी बोलू नये' याविषयी विद्यार्थ्यांना सांगताना सानेगुरुजी स्वानुभवाच्या प्रसंगाच्या स्मरणाने हेलावून जात.

# पाखराचे सुतक

एकदा श्याम अंगणामध्ये खेळत होता. इतक्यात एक लहानसे पाखराचे पिलू टपकन खाली पडले. फार उंचावरून पडल्यामुळे त्याची फारच दुर्दशा झाली होती. त्याची इवलीशी छाती लपलप करीत होती. फारच लहान होते ते. नीट पंखही फुटले नव्हते त्याला.

श्यामने त्याला हळूच उचलण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर ते आपली मान पुढे करून 'चीऽऽ चीऽऽ' असे केविलवाणे ओरडले. श्यामने आपल्या भावाला बोलावले. दोघांनी मिळून हळूच त्याला फडक्यात उचलले. घरात आणून मऊ मऊ अशा कापसावर ठेवले. श्यामच्या मनात भूतदया जागृत झाली. त्याने पिलाच्या चोचीत दाणा आणि पाणी घालायला सुरुवात केली. तांदळाच्या बारीक कण्या हळुवारपणे त्याच्या चोचीत भरवू लागला. झारीने थेंब थेंब पाणी त्याने दिले. त्या इवल्याशा पिलाला



# पितृहृदय

श्याम दापोलीला शिकत होता. तिथून तो अधूनमधून सुटीच्या दिवसांत आईला भेटायला पालगडला येई. दापोली ते पालगड हे अंतर अंदाजे साडेसहा कोस म्हणजे सुमारे १५ किलोमीटर्स होते. असाच एकदा श्याम घरी भेटीस आला, त्यावेळी त्याचे वय १२-१३ वर्षांचे होते. घरी पोचायला रात्र झाली; पण आपल्या अण्णाला पाहून सारी भावंडे खूष झाली.

"एवढी रात्र झाली, श्याम, उशिरा निघालास का रे दापोलीहून?" आईने पाठीवरून हात फिरवीत विचारले.

"माझ्याच्याने चालवतच नव्हते. खूप गळून गेल्यासारखे वाटत होते. म्हणून थांबत थांबत आलो." श्यामने उत्तर दिले.

"अरे, पण मग पायी येण्याचे एवढे काय अडले होते? पुढे संक्रांतीला आला असतास."

"नाही रे, मी कशी रागावेन बाळ तुझ्यावर? मला फक्त तुझी काळजी वाटत होती. तू वाईट कामासाठी थोडाच पळून गेला होतास? देवदर्शनासाठी, यात्रेसाठी जात होतास तू. फक्त एक गोष्ट मात्र नेहमीकरिता लक्षात ठेव, श्याम. चोरी-चहाडी करून कधीही पळून जाऊ नकोस. वाईट संगतीने पळून जाऊ नकोस. चांगल्या कामासाठी, देवासाठी गेलास तर तुला कोणीच नावे ठेवणार नाही. सगळ्या संतांनी देशभक्तीसाठी घरदार सोडले. माझाही मुलगा सत्कार्यासाठी घरातून गेला, तर मी देवाचे आभारच मानीन."

किती थोर माऊली होती ती! श्यामला खूप अभिमान वाटत असे तिचा!



खाता येते की नाही, दाणे खाऊन ते मरून जाईल की काय, असा कोणताही विचार श्यामच्या बालबुद्धीत शिरला नाही.

शेवटी त्या पिलाने मान टाकली. श्याम त्याला म्हणाला, "आम्ही तुला पिंजऱ्यात नाही हो कोंडून ठेवणार. तू बरा झालास की उडून आपल्या आईकडे जा."

मृतवत असलेल्या त्या पिलावर श्यामच्या या प्रेमळ बोलण्याचा काय परिणाम होणार? श्यामने आईला हाक मारली,

"आई, हे पिलू बघ ग कसे करते आहे? दाणापाणी घेत नाही आणि मानही वर करीत नाही ते."

आई स्वयंपाकखोलीतून बाहेर आली. पिलाला हलकेच हातात उचलून म्हणाली, "श्याम, हे जगणार नाही हो. त्याला शांतपणे मरू दे. सारखा सारखा हात लावू नकोस, त्याला वेदना होतात."

शेवटी ते पिलू चोच वासून मरून पडले.

श्यामला खूपच दुःख झाले. त्या दोघा भावांनी पिलाची उत्तरक्रिया करायची ठरवली. त्याला झाडाखाली पुरण्यासाठी श्यामने आईच्या जुन्या चोळीचा जरीच्या खणाचा तुकडा घेतला. त्यात त्या पिलाला गुंडाळले. शेवंती आणि मोगऱ्याच्या झाडांच्या मध्ये एक लहानसा खड्डा खणला. खाली रंगीबेरंगी सुवासिक फुले पसरली. त्यावर अलगदपणे पिलास निजवले. जड अंतःकरणाने डोळे मिटून हळूहळू त्यावर माती लोटली. मांजराने उकरू नये म्हणून वरती एक मोठा दगड ठेवला. घरात येताच श्याम एका कोपऱ्यात रडत बसला.

"अरे, असा बाजूला जाऊन का बसलास?" आईने विचारले.

"आई, मला त्या पाखराचे सुतक आहे." श्याम रडतच बोलला.

"अरे वेड्या, पाखराचे सुतक नको हो धरायला."

"का बरं? आपल्या घरातील कोणी वारले



"श्याम, ऊठ बाळ, पुन्हा नाही हो मास्तर मारायचे. अरे, मास्तरांनी मारले म्हणून का असे पळून जावे? ऊठ, दमलास ना? अग, याचे पान वाढ आधी."

आपल्या घर सोडून निघून जाण्याचे निमित्त परस्पर गुरुजींवर गेल्याचे पाहून तो गप्पच राहिला. आई श्यामजवळ आली. हळूहळू त्याचे अंग चेपू लागली. तिने त्याला जेवायला वाढले. नंतर ती म्हणाली,

"श्याम, बरे नाही का वाटत? मी हट्ट करू नको म्हणून सांगितले, ते ऐकले नाहीस ना?"

श्यामला ते ऐकून रडूच कोसळले. तो सावकाश म्हणाला, "आई, मी चुकलो. मी तुझं ऐकलं नाही. तू म्हणाली, जायचे असेल तर पायी जा. आहे ताकद? म्हणून मी पायी जाऊ पाहात होतो. माझ्या शक्तीपलीकडचे काम करू पाहात होतो. कुठे तो पराक्रमी, निष्ठावान ध्रुवबाळ आणि कुठे तुझा हा शेंबडा श्याम? आई, तू रागावलीस माझ्यावर? क्षमा कर, मी चुकलो ग."

गुरुजी म्हणाले, “आजपासून तुमच्या मुलाला चार बोटेही लावणार नाही हो. तुमची मुले चांगली व्हावी, म्हणून कधीतरी करतो शिक्षा. मला त्यात काय मिळणार?”

आईला श्याम कुठे गेला असावा, त्याची थोडीशी कल्पना होती. पण खात्री नसल्यामुळे ती माऊली काही बोलली नाही. शोधाशोध सुरू असताना खाली मान घालून गुपचूप घराकडे येणारा श्याम त्याच्या चुलत्यांना दिसला. त्यांनी श्यामची बखोटी धरून ओढतच त्याला घरी आणले. रस्त्यात तमाशा पाहायला मुलांची गर्दी जमली. चोराला पाहायला लोक जमावे, तशी गर्दी होती. श्यामला मेल्याहून मेल्यासारखे झाले.

घरी येताच हातपाय धुवून श्याम अंथरुणावर पडला. तो भुकेला होता. चालून चालून दमलाही होता. त्याचे वडील त्याला रागावले नाहीत, याचे त्याला आश्चर्य वाटत होते. हळुवारपणे त्याच्या पाठीवरून हात फिरवीत प्रेमाने वडील म्हणाले,



म्हणजे आपण सुतक धरतो ना? मग हे पाखरू आपल्याच अंगणात पडले ना?”

आईने श्यामची समजूत घातली, “श्याम, माणसे कोणत्यातरी रोगाने मरतात. त्यांच्या मृत्यूपूर्वी त्यांची सेवा करणाऱ्या घरातल्या माणसांना कदाचित त्याचा संसर्ग झाला असेल म्हणून त्या मंडळींनी इतरांपासून काही दिवस दूर राहावे. त्यामुळे साथीच्या रोगाचे जंतू इतरत्र फैलावत नाहीत. अशा चांगल्या हेतूने सुतक पाळण्याची प्रथा पडली आहे बरे! त्या पाखराला काही रोग झाला होता का? ते तर बिचारे उंच झाडावरून पडले, दुखावले आणि प्राणास मुकले. त्याचे कसले सुतक? जा, स्वच्छ हातपाय धुवून ये आणि देवाला नमस्कार कर. त्या इवल्याशा जीवाला सद्गती मिळो म्हणून प्रार्थना कर म्हणजे झाले. वाईट वाटून घेऊ नकोस हो. तुम्ही दोघांनी त्याला प्रेम दिलेत. देवही तुमच्यावर नेहमी प्रेम करील. देवाच्या लेकरांना किडा, मुंगी, पशू, पक्षी, दुःखी मानव यांना तुम्ही जे द्याल ते शतपटीने

वाढवून देव आपल्याला देत असतो. प्रेमाने, मेहनतीने पेरलेला एक दाणा भरलेले कणीस आपल्यासाठी घेऊन येतो हो श्याम!”

भूतदयेचा आणि प्रेमाविष्काराचा एक सुंदर पाठ आज श्यामला आईकडून मिळाला. तो त्याने जीवनभर जपला.

## श्यामचे पोहणे

श्याम खूपच भित्रा होता. तो धीट व्हावा म्हणून त्याची आई नेहमी प्रयत्न करायची. त्यासाठी प्रसंगी ती कठोरही व्हायची. श्याम पोहायला शिकला, तो प्रसंगही त्याच्या जीवनाला चांगले वळण देणारा आहे.

कोकणातील विहिरी पावसाळ्यात तुडुंब भरत असत. त्या पाण्यात पोहण्याची काही वेगळीच मौज असायची. मुलांना पोहायला शिकविण्याची ही



मनोमन पटले. पण आता घरी परत जाण्याची लाज वाटत होती. खूप वेळ तो त्या जंगलातच झाडाखाली स्वस्थ बसला. पोटातली भूक आणि दुखणारे पाय त्याला अस्वस्थ करीत होते. शेवटी त्याची पावले घराकडे वळली. रखडत रखडत तो गावशिवेवर आला. पण शरमेमुळे गावात शिरण्याचे धैर्य त्याला होईना. गावाबाहेरच्या झोळाईच्या मंदिरात तो अंधाऱ्या गाभाऱ्यात लपून बसला. मात्र भुकेने कासावीस झाल्यावर लाजलज्जा सोडून त्याने घराकडे जायला सुरुवात केली.

इकडे दिवसभर गावात श्यामची शोधाशोध सुरू होती. शाळा सुटल्यावर त्याच्या मित्रांनी त्याचे दप्तर घरी आणून दिले. आदल्या दिवशी श्यामच्या घाणेरड्या हस्ताक्षराबद्दल त्याला मुख्याध्यापकांनी मार दिला होता. श्यामच्या वडिलांना वाटले, त्याच कारणामुळे श्याम पळून गेला असावा. ते मुख्याध्यापकांना तसे बोलले. गुरुजींना वाईट वाटले.

श्याम खूप नाराज झाला. त्याने मनातल्या मनात ठरवले की पहाटे यात्रेकरूंच्या बैलगाड्या निघतील. त्यांच्या मागे मागे आपण जाऊ. पण या वर्षी यात्रेला जायचेच.

सकाळी त्याला जाग आली, त्यावेळी यात्रेकरू मंडळींच्या गाड्या निघून गेल्या होत्या. श्याम लवकरच दप्तर घेऊन शाळेत गेला. मुले यायचीच होती. त्याने दप्तर पडवीत ठेवले आणि वाईच्या दिशेने चालायला लागला. त्याला कशाचेही भान नव्हते. यात्रेचे भूत जणू त्याच्या मानगुटीवर बसले होते. तो तरातरा चालत होता. पण दहा-अकरा वर्षांचा मुलगा उपाशीपोटी चालून चालून चालणार किती? दुपार झाली. उन्हाचा ताप सुरू झाला. चटके लागू लागले. श्याम घामानेही हैराण झाला. शेवटी तो दमून गेला. भुकेने व्याकूळ झाला; आणि त्याला रडू कोसळले. जेमतेम चार कोस तो चालून गेला होता, तोच त्याची अशी स्थिती झाली. पुढची मजल आपण गाठू शकणार नाही, हे त्याला



उत्तम संधी असे. श्यामच्या बालपणी नवशिक्यांच्या कमरेला लाकडाचा तुकडा बांधून तुंडुंब भरलेल्या विहिरीत सोडत. विहिरीत पट्टीचे पोहणारे असत. ते ह्या घाबरलेल्या नव्या मुलांना सांभाळून घेत, पोहण्याचे धडे देत मार्गदर्शन करीत. प्रथमच पाण्यात पडलेली मुले घाबरून जात. हळूहळू ती पोहायला शिकत.

श्यामला पाण्याची खूप भीती वाटायची. तो विहिरीच्या काठावरून पोहणाऱ्यांची गंमत पाहायचा. स्वतः मात्र मुळीच पाण्यात उतरत नसे. ‘ढकला रे श्यामला पाण्यात’ असे कोणी म्हटले की तो तेथून पळून जात असे. आई त्याला नेहमी म्हणायची,

“अरे श्याम, तुझ्यापेक्षा कितीतरी लहान लहान मुले मजेने पोहतात आणि तुला रे कसली भीती वाटते? लहान मुलीसुद्धा पोहायला शिकल्या आहेत. बांगड्या भरणाऱ्या मुलींपेक्षाही तू भित्रा आहेस का रे?”

श्याम उत्तर देत नसे; पण पाण्यात उतरून पोहण्याचे धैर्य मात्र त्याच्या अंगी नव्हते. आईने एका रविवारी त्याला पोहायला पाठवायचेच असा निश्चय केला. त्याच्या पोहणाऱ्या मित्रांना तिने सकाळीच श्यामला नेण्यासाठी या, म्हणून सांगून ठेवले होते. त्याप्रमाणे मुले आली. श्याम त्यावेळी माळ्यावर लपून बसला. आईच्या सांगण्याप्रमाणे मुले त्याला शोधू लागली. शेवटी तो सापडला. मित्र म्हणाले,

"श्याम, चल ना रे आमच्याबरोबर. असा काय लपून बसतोस?"

"घेऊन जा रे त्याला. आज त्याला विहिरीत सोडल्याशिवाय राहू नका." आईपण जरा चिडूनच बोलली. पण श्याम जागचा हलत नव्हता. आईने सरळ श्यामचा हात धरून त्याला बाहेर ओढले व माळ्यावरून फरफटत खाली आणले.

"धरा रे याला. ओढून घेऊन जा. मी मागून हाकलते. चांगलं मारते त्याला. बघू कसा



नाही म्हणून सांगितले. तरीही श्याम काही ऐकेना. त्याने आईमागे भुणभूण लावली. शेवटी चिडून आई म्हणाली,

"जायचे असेल तर जा; पण पायी जावे लागेल. आहे ताकद? आहे हिंमत?"

"पण आई, एवढे चाळीस-पन्नास कोस माझ्याच्याने कसे चालवेल? मी दमून नाही का जाणार? मला भीती वाटते ग!" श्याम हळूच बोलला.

"ध्रुवबाळ देवाकडे गेला तेव्हा घाबरला नाही. साप, वाघ त्याला दिसले; पण त्यांनी ध्रुवाला मार्ग दाखवला. त्यांनी खाऊन टाकले नाही. दमूनभागून ध्रुव रस्त्यात झोपला, तर नागाने फणा काढून त्याच्या डोक्यावर सावली केली आणि उन्हाच्या कवडशापासून त्याचे रक्षण केले. त्याला तहान लागली तर चिमुकल्या पक्षांनी चोचीतून पाणी आणून त्याला पाजले. आहे तुझ्याजवळ ध्रुवासारखी श्रद्धा? नाही ना? मग यात्रेला जायचा हट्ट करू नकोस. जेव्हा जमेल तेव्हा आपण जाऊ." आईने समजावले.

तुला म्हणावे? माझ्या श्यामला कोणी नावे ठेवू नयेत, म्हणूनच ना मी तुला मारले? तुझ्या आईला 'तुमची मुले भित्री आहेत' असे कोणी म्हटले तर तुला आवडेल का? रागावू नकोस बाळा, चांगला धीट हो. सगळ्या गोष्टी शिकून घे."

आईचे ते भावनात्मक बोलणे ऐकून श्यामचा निर्धार बारगळला. तो रडू लागला. यापुढे आपण धीटपणे वागायचे, कोणीही आपल्याला भित्रा म्हणू नये, असेच काम करायचे, असे श्यामने मनाशी ठरवले आणि तो आईबरोबर जेवायला बसला.

# यात्रेसाठी श्यामचे पलायन

वाईला यात्रा भरत असे. त्यावर्षी श्यामचे चुलत आजोबा वगैरे मंडळी यात्रेला जाणार होती. श्यामने यात्रेला जाण्याचा हट्ट धरला; परंतु घरच्या कठीण आर्थिक परिस्थितीमुळे आईने त्याला जायचे



जात नाही पोहायला."

मुले श्यामला ओढू लागली. आई त्याच्या पाठीवर शिंपट्या ओढू लागली.

"नको ग आई मारू." श्याम कळवळला.

"आज मी सोडणार नाही तुला. प्रेमाने पोहायला जा सांगते, तर ऐकत नाहीस ना? चांगला दोन-चार वेळा बुडवा रे याला. चांगले नाकातोंडात पाणी जाऊ दे. लाज नाही वाटत लपून बसायला?"


आई पुन्हा मारू लागली.

"नको मारू आई, मी जातो." असे रडत रडत म्हणून श्याम मित्रांबरोबर गेला. विहिरीत तीन-चार चांगले पोहणारे होते. श्याम थरथर कापत काठावर उभा होता. शेवटी कुणीतरी त्याच्या पाठीला फळी बांधून त्याला पाण्यात लोटून दिले. श्याम जिवाच्या आकांताने ओरडला,

"मेलो, मेलो, आई ग मेलो."

बुचकळी खाऊन श्याम पाण्यातून वर आला. पाण्यातील मित्रांना मिठी मारू लागला; पण

त्यांनी त्याला तसे करू न देता पोहण्यासाठी हातपाय कसे मारायचे ते शिकविले. दोन-तीन दिवसांतच श्यामची भीती ओसरली. तो स्वतःहून पोहायला येऊ लागला; आणि लवकरच उत्तम पोहायला शिकला. नंतर तो अगदी बिनधास्तपणे पाण्यात उडी मारून तास-तास पोहू लागला.



पहिल्याच दिवशी श्यामच्या मित्रांनी घरी येऊन आईला घडलेला किस्सा सांगितला. आई म्हणाली,

“अरे पाण्यात पडल्याशिवाय, नाकातोंडात



पाणी गेल्याशिवाय भीती जात नाही.”

आईने जबरदस्तीने पाठवले, त्यासाठी मारले, याचा राग श्यामच्या मनात होता. सगळी मंडळी जेवली; पण तो जेवायला आला नाही. आईने स्वतःचे पान मांडले, त्यावेळी तिने श्यामला हाक मारली,

“अरे श्याम, ती दह्याची कोंढी घे आणि सगळे दही तू खा हो. तुला दही खूप आवडते ना?”

“मला नको जा. सकाळी मार मार मारलेस आणि आता दही देतेस.” रडवेला होऊन श्याम म्हणाला, “हे बघ, अजून माझ्या पाठीवर, अंगावर वळ आहेत. हे वळ आहेत, तोवर मी दही खाणार नाही.”

आईचे डोळे भरून आले. तिला जेवण जाईना. ती उठली, हात धुतले आणि तेलाची वाटी घेऊन ती हळुवारपणे श्यामच्या पाठीला तेल लावू लागली. थोड्या वेळाने ती श्यामला म्हणाली,

“श्याम, तू भित्रा आहेस, असे का जगाने